# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२० – २५६०१२६४
२५६०१२६५
ई–मेल : pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

---

संदर्भ – साफुपुवि / निववि / 1458

दिनांक :– १९ / १० / २०१५

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था व
आदिवासी विभागातील महाविद्यालये / संस्था.

विषय:– शैक्षणिक वर्ष २०१५–१६ साठी महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजना व आदिवासी विभागातील महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत तसेच विद्यापीठ वार्षिक अहवाल सन २०१४–१५ साठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत..

संदर्भ – या कार्यालयाचे पत्र १. क्र.साफुपुवि / निववि / १३७६, दि. २८ / ९ / २०१५.
२. क्र.साफुपुवि / निववि / १३७९, दि. ३० / ९ / २०१५.

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१५–१६ साठी महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांकडून तसेच आदिवासी विभागातील महाविद्यालये / संस्थांकडून कार्यशाळा / चर्चासत्रे / परिषदा, क्रीडा साहित्य, कार्यालयीन व शैक्षणिक उपकरणे, बांधकाम इत्यादी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. या व्यतिरिक्त गरजेवर आधारीत उपक्रमासाठी फक्त आदिवासी विभागातील महाविद्यालये / संस्था यांचेकडून ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. तसेच वार्षिक अहवाल सन २०१४–१५ साठीची माहिती ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेली होती.

उपरोक्त प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची मुदत **मंगळवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी सायंकाळी ६.०० अशी निश्चित करण्यात आलेली होती. तथापि, सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची मुदत शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोंबर २०१५ रोजी सायंकाळी ६.०० पर्यंत अशी वाढविण्यात आलेली आहे.**

**त्याचप्रमाणे वार्षिक अहवालाची माहिती देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची मुदत शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोंबर २०१५ रोजी सायंकाळी ६.०० पर्यंत अशी करण्यात आलेली आहे.**

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे –**

(unipune.ac.in – Home page - BCUD Online – Login – For College Users– College Login & Password –Main Menu - Planning & Development - QIP)

सदर कार्यशाळा / चर्चासत्रे / परिषदा, क्रीडा साहित्य, कार्यालयीन व शैक्षणिक उपकरणे, बांधकाम, गरजेवर आधारीत उपक्रम इ. साठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांची **हार्डकॉपी** मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे जोडून तसेच वार्षिक अहवालाची माहिती भरलेल्या प्रस्तावाची हार्डकॉपी **दिनांक ३१ ऑक्टोबर २०१५ पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये** जमा करण्यात यावी.

संबंधित महाविद्यालये / संस्थांनी ऑनलाईन प्रस्तावांची हार्डकॉपी अंतिम तारखेपर्यंत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करावी. ऑनलाईन व्यतिरिक्त सादर केलेल्या कोणत्याही प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

19/10/15

उपकुलसचिव
नियोजन व विकास